# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०७/२०२६ (गुरूवार )**

---

## नागपूर ग्रामीण पोलीसांनी वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या २ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) लावला आहे

**पोलीस स्टेशन उमरेड** :— मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात उमरेड पोलीसांनी **वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या आरोपीतांचा** टोळी प्रमुख आणि सदस्य अशा एकुण २ आरोपीतांविरुद्ध **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे १) जानी उर्फ सोहेब सईद शेख, वय २३ वर्ष, रा. कावरापेठ ,उमरेड जि. नागपूर हा असुन अरोपी २) नामे पप्पु उर्फ प्रफुल ज्ञानेश्वर गायधने, वय २५ वर्ष, रा.कावरापेठ उमरेड जि.नागपुर हा सदस्य आहे.**

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दिनांक २४/०५/२०२६ रोजी रात्री १०:०० ते ११:०० वाजताच्या सुमारास कावरापेठ येथे गोलू शेख यांच्या हबीबी पानठेल्या समोर आरोपी सोहेल उर्फ जानी शाहीद शेख आला त्यावेळी मृतक राजकुमार पवार यांनी आरोपी यास “क्या रे जानी” असे म्हणत त्याचे मानेवर हात मारला असता आरोपीला मृतकाचा राग आला. आरोपीने **राजकुमार मारोती पवार वय ५० वर्षे, रा. शोभापुर कॉलनी, शक्ती नगर, पाताखेळी, ता. घोडा डोंगरी, जि बैतुल, राज्य मध्यप्रदेश ह.मु. कावरापेठ, उमरेड यांचेवर** चाकुने वार करून गंभीररीत्या जखमी करून त्यांचा खुन केला. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन उमरेड येथे अप. क्र. ६१२/२०२६ **कलम १०३(१), ६१(२), २३८(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा** नोंद आहे. सदर गुन्हयात आरोपी **पप्पु उर्फ प्रफुल ज्ञानेश्वर गायधने याचा सुध्दा सहभाग असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले.**

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख जानी उर्फ सोहेब सईद शेख हा नेहमी एकटयाने किंवा साथीदारांसह गुन्हे करीत आलेला आहे. नमुद टोळी प्रमुख जानी उर्फ सोहेब सईद शेख व टोळीतील सदस्य २) नामे पप्पु उर्फ प्रफुल ज्ञानेश्वर गायधने हे त्यांचे टोळीची दहशत व वर्चस्व पसरविण्यासाठी खुन, घातक हत्यारांनी दुखापत अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतात. सदर टोळी प्रमुख आाणि सदस्यावर पोलीस स्टेशन उमरेड येथे गंभीर गुन्हे नोंद आहेत. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्याचेवर गुन्हे नोंद करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**उमरेड पोलीसांनी नमुद २ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**



**आरोपी जानी उर्फ सोहेब सईद शेख**



**आरोपी पप्पु उर्फ प्रफुल ज्ञानेश्वर गायधने**

# १२५.६६५ किलोग्रॅम गांजा तस्करी प्रकरणातील गांजा पुरवठा करणारे दोन आरोपी प्रयागराज, राज्य उत्तर प्रदेश येथुन अटक, देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक २६/०६/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहा पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन देवलापार यांच्या नेतृत्वाखाली देवलापार पोलीसांनी अंमली पदार्थाविरोधात मोठी कारवाई करून १२५. ६६५ किलो गांजा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार असा एकुण **३५,१३,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन देवलापार येथे कलम ८(क),२०(ब) (ii) (सी),२९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद आहे.**

वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात देवलापार पोलीसांनी गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुरावे आणि सात्यतपुर्ण शोाध मोहीमेच्या आधारे दिनांक २८/०६/२०२६ रोजी सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी नमुद गुन्हयातील होंडा सिटी कार क्रमांक युपी १६ एपी २०४३ चा चालक पाहीजे आरोपी नामे इमरान मो. हनीफ खान ,वय ३८ वर्षे, रा. लोकमान्य नगर बस स्टॉपजवळ, ठाणे शहर, जि. ठाणे याला खवासा (मध्य प्रदेश) बॉर्डर परिसरातून ताब्यात घेवुन अटक केली. **नमुद गुन्हयात देवलापार पोलीसांनी सखोल तपास करून साखळी पुरावे जोडुन गांजा पुरवठा करणारे आरोपी क्र. १) अमीतकुमार उर्फ अमीत अवधेशसिंह पटेल, वय ३२ वर्ष, रा लालतारा (गोसाईतारा) ता. मेजा जि.प्रयागराज, पोलीस स्टेशन खिरी प्रयागराज आणि क्र २) आंशीक उर्फ गोलु विजयप्रकाश विश्वकर्मा, वय ३० वर्ष, रा.सिरहिर तह.मेजा जि.प्रयागराज ,पोलीस स्टेशन खिरी प्रयागराज यांना त्यांच्या राहत्या घरून ताब्यात घेवुन त्यांना दिनांक ०१/०७/२०२६ रोजी सदर गुन्हयात अटक केली असुन नमुद आरोपींचा दिनांक ०४/०७/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, १० लाख २८ हजार ३२० रूपयांचा मुद्देमाल जप्त, देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक ०१/०७/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, कारने काही इसम अवैधरीत्या दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ जुने देवलापार पोलीस स्टेशन समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान स्विफ्ट कार क्र. एम एच—३२/ए एक्स ५९९७ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता सदर कारमध्ये खाकी रंगाच्या खोक्यामध्ये **ऑफिसर्स चॉईस विदेशी दारू** मिळुन आली. **आरोपी नामे १) तुषार प्रभाकर बदलमवार, वय ३० वर्ष, रा. बेलगाव, पोस्ट झडगाव त. जि. वर्धा, ह. मु. रामनगर सिंधी मेघे, ता. ति. वर्धा २) रूपेश शिवदास कांबळे, वय २५ वर्ष, रा. थूल ले आउट, भिमवाडी सिंधी मेघे, ता. जि. वर्धा हे अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष विदेशी दारू ऑफिसर्स चॉईस च्या १९२० निपा किंमती ३,२८,३२०/—रूपये आणि स्विफ्ट कार क्र. एम एच—३२/ए एक्स ५९९७ किंमती ७,००,०००/—रू असा एकुण किंमती १०,२८,३२०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी १) तुषार प्रभाकर बदलमवार, वय ३० वर्ष, रा. बेलगाव पोस्ट झडगाव त. जि. वर्धा, ह. मु. रामनगर सिंधी मेघे वर्धा ता. ति. वर्धा २) रूपेश शिवदास कांबळे, वय २५ वर्ष, रा. थूल ले आउट, भिमवाडी सिंधी मेघे, ता. जि. वर्धा यांचेविरूध्द पोलीस स्टेशन देवलापार येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




# डुमरी उड्डाण पुलावरील अपघात प्रकरणी प्रसिद्ध झालेल्या वृत्ताबाबत वस्तुस्थिती

काही वृत्तपत्रांमध्ये डुमरी उड्डाण पुलावरील अपघात प्रकरणाच्या अनुषंगाने कन्हान पोलीसांच्या कारवाईबाबत संशय व्यक्त करण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. सदर वृत्ता बाबत वस्तुस्थिती अशी आहे की, दिनांक २५/०६/२०२६ रोजी रात्री ११:०० ते १२:०० वाजेच्या सुमारास ओमप्रकाश बावणे आणि त्याचा मित्र रोहित सोयाम हे मोटर सायकल ने कांद्री वरून आमडी फाटयाकडे जात असता डुमरी उड्डाण पुलावर इंजीन खराब झाल्यामुळे उभा असलेला ट्रक क्र. युपी ५३ इ टी ९४०५ या वाहनाला त्यांच्या मोटर सायकल ची धडक बसुन त्यांचा अपघात होवून ते मरण पावले.

**सदर अपघाताची माहिती प्राप्त होताच कन्हान पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन जखमींना वैदयकीय उपचाराकामी कामठी रूग्णालय येथे पाठवले. सदर घटनास्थळाचा पंचनामा, साक्षीदारांचे बयाण तसेच उपलब्ध इतर सर्व पुरावे संकलित करून कार्यवाही केली. घटनास्थळावरील ट्रक क्र. युपी ५३ इ टी ९४०५ या वाहनाची संपुर्ण माहीती, कागदपत्रे प्राप्त करून प्राप्त कागदपत्रानुसार सदर वाहनाचा चालक/मालक आरोपी राणाप्रताप कुशवाहा, वय २५ वर्षे, रा. येनपुर टोला, शिवपट्टी, कुशीनगर, राज्य उत्तरप्रदेश हमु. खदान नं. ३, कन्हान याचे विरूध्द गुन्हा नोंद केला आहे. कन्हान पोलीस सदर प्रकरणाचा निष्पक्ष व सखोल तपास करीत आहेत.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी व विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ३०/०६/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने एक इसम अवैधरीत्या देशी व विदेशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ वाकी बस स्टॉप पाटणसांवगी सावनेर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान ॲक्टीव्हा एक्स एस क्र. एम एच ४० डी ए ८०६९ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू व विदेशी दारूच्या निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे अनिल नामदेव सोमकुवर, रा. कवडस पाटणसांवगी हा अवैधरीत्या देशी व विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या ०३ निपा २) विदेशी दारूच्या ०२ निपा किंमती आणि ३) ॲक्टीव्हा एक्स एस क्र. एम एच ४०/ डी ए ८०६९ असा एकुण किंमती २०,७१०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी अनिल नामदेव सोमकुवर, रा. कवडस पाटणसांवगी याचे विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने